अंक – २ रा

दिनांक :-
११ जानेवारी २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल


गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# डेबिट/क्रेडिट कार्ड क्लोनिंग

## प्रसंग


अजयचे प्रमोशन झाल्याने तो रविवारी संध्याकाळी आपल्या मित्रांसोबत एका हॉटेलमध्ये जेवायला गेला. जेवण झाल्यावर बिल देण्याच्या वेळी त्याने मी बिल देणार असे सांगून वेटरला स्वाईप मशीन आणण्यास सांगितले. वेटर स्वाईप मशीन घेऊन आल्यानंतर अजय ने त्याला आपले डेबिट (एटीएम) कार्ड दिले आणि मित्रांशी गप्पा मारण्यात खंड पडू नये म्हणून पीन देखील वेटरलाच एंटर करण्यास सांगितला. वेटरने पीन घेऊन डेबिट कार्ड स्वाइप केले आणि अजयला परत केले. अजय आपल्या मित्रांसोबत तिथून निघून गेला आणि दोन दिवसानंतर त्याला बँकेचे मेसेजेस प्राप्त होण्यास सुरुवात झाली. त्यातून त्याला असे समजले की, बिहार येथून त्याच्या बँक खात्यातून डेबिट कार्डद्वारे ५०,००० रुपये काढण्यात आले आहेत, परंतु त्याचे डेबिट कार्ड त्याच्याच ताब्यात होते त्यामुळे त्याने सदर बाबत सायबर सेलमध्ये तक्रार नोंदवली. या तक्रारीच्या तपासात असे निष्पन्न झाले की, ज्या वेटरकडे अजयने आपले डेबिट कार्ड देऊन त्याला पिन सांगितला होता त्याने त्याच्याकडील कार्ड स्किमरने अजयच्या डेबिट कार्डचा डाटा कॉपी करून त्याच्या बिहार येथील मित्राला पाठवला होता. या डाटा आधारे वेटरच्या बिहारमधील मित्राने आजयच्या डेबिट कार्डचे क्लोनिंग तयार केले होते आणि त्याच्या खात्यातून ५०,००० रुपये काढून घेतले.

# डेबिट / क्रेडिट कार्डची माहिती जाणून घ्या!




१. डेबिट / क्रेडिट कार्ड प्रोव्हायडर / बँकेचे नाव
२. डेबिट / क्रेडिट कार्डचा क्रमांक
३. कार्ड होल्डर चे नाव
४. डेबिट / क्रेडिट कार्ड चा डाटा असणारी स्मार्ट चीप
५. डेबिट / क्रेडिट कार्डची वैधता
६. डेबिट / क्रेडिट कार्डचे पेमेंट नेटवर्क (VISA/MASTERCARD/ RUPAY)

# डेबिट / क्रेडिट कार्डची माहिती जाणून घ्या!




१. डेबिट / क्रेडिट कार्डचा डाटा असणारी Magnetic Strip
२. होलोग्राम स्टिकर
३. डेबिट / क्रेडिट कार्ड प्रोव्हायडर बँक / कार्ड कंपनी चा संपर्क क्रमांक / वेबसाईट/ ई-मेल आयडी
४. डेबिट/ क्रेडिट कार्ड होल्डर ची सही
५. कार्डचा सी व्ही व्ही क्रमांक ( customer verification value number)
६. पेमेंट नेटवर्क चा लोगो

# डेबिट / क्रेडिट कार्डची माहिती जाणून घ्या!




- क्रेडिट/ डेबिट कार्डच्या स्मार्ट चीप मध्ये असणारा डाटा (अकाउंट धारकाची माहिती) हा Encrypted असल्याने तो क्लोन / कॉपी केला जाऊ शकत नाही त्यामुळे त्याचा गैरवापर केला जाऊ शकत नाही.

- क्रेडिट/ डेबिट कार्ड चा असणारा डाटा हा Encrypted नसल्याने तो बाजारात उपलब्ध असणाऱ्या कार्ड स्किमर/ रीडर च्या साहाय्याने कॉपी करून त्याआधारे एका कार्ड चे दुसरे क्लोन कार्ड तयार केले जाऊ शकते.  परंतु संबंधित डेबिट/ क्रेडिट कार्डचा पिन हा त्या कार्ड क्लोन करणाऱ्या व्यक्तीस माहित असल्याशिवाय त्या क्लोन कार्डचा वापर करता येत नाही त्यामुळे आपल्या पिनची गोपनीयता अत्यंत महत्त्वाची आहे.




## NCF - Near Field Communication

- सध्या सर्व सर्व्हिस प्रोव्हायडर आपल्या ग्राहकांना डेबिट किंवा क्रेडिट कार्ड देताना त्यात ही नवीन सुविधा देत आहेत.

- २००० रुपयांपेक्षा कमी रकमेचे व्यवहार करताना वरील चिन्ह असलेले डेबिट किंवा क्रेडिट कार्ड तशी सुविधा असलेल्या स्वाईप मशीन वर टॅप करून कार्डचा पिन दाखल न करता पेमेंट करता येते.

- ही सुविधा जशी फायदेशीर आहे तसेच ती धोकादायक देखील ठरू शकते कारण अशा कार्डवर व्यवहार करताना पिनची गरज नसते.

- आपल्याला ही सुविधा नको असल्यास तसेच संबंधित बँक अथवा सर्विस प्रोव्हायडर ला कळवून ही सुविधा बंद देखील करता येते.

# डेबिट / क्रेडिट कार्डची माहिती जाणून घ्या!

## ए.टी.एम. मशीन द्वारे होणारी क्लोनिंग




ए. टी. एम मशीनचा कार्ड स्लॉट- मुळ

ए.टी.एम. मशीन चा मूळ कार्ड स्लॉट सारखा दिसणारा परंतु कार्ड स्किमर असलेला कार्ड स्लॉट जो मूळ कार्ड स्लॉट वर लावला जातो.

## ए.टी.एम. मशीन द्वारे होणारे क्लोनिंग

- चित्रात दाखविल्याप्रमाणे ज्या ए.टी.एम. सेंटरमध्ये आपल्या कार्डद्वारे पैसे काढण्याकरिता कार्ड इन्सर्ट करून लगेच कार्ड काढून घेऊन नंतर कार्डचा पिन दाखल करून पैसे काढले जातात अशा ए.टी.एम. मशीनच्या कार्ड इन्सर्ट करण्याच्या कार्ड स्लॉट वर त्या सारखा दिसणारा परंतु सदर कार्डचा डाटा कॉपी करून ठेवणारा स्लॉट गुन्हेगार बसवतात. तसेच पिन दाखल करण्यासाठी असलेल्या की बोर्ड च्या वर किंवा ए.टी.एम मशीन च्या वर तो कीबोर्ड दिसेल अशा पद्धतीने कॅमेरा बसवला जातो कि पिन दाखल करताना व्हिडीओ रेकॉर्ड केला जाईल. त्यामुळे अशा ए.टी.एम सेंटरमध्ये कार्ड वापरताना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

# डेबिट / क्रेडिट कार्डची माहिती जाणून घ्या!

## पीओएस - पॉईंट ऑफ सेल

- डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे बिल पेमेंट स्वीकारण्याकरिता दुकान, हॉटेल, मॉल आणि इतर ठिकाणी ज्या कार्ड स्वाईप मशीन वापरल्या जातात त्यांना पॉईंट ऑफ सेल असे म्हणतात.

- याठिकाणी बिल पे करण्याकरता ग्राहकाचे क्रेडिट किंवा डेबिट कार्ड सदर मशिनमध्ये स्वाइप करून त्यांचा पिन ग्राहकांकडून त्या मशीनवर दाखल केल्यानंतर संबंधित स्वाईप मशीनशी कनेक्ट असणाऱ्या बँक खात्यात ग्राहकाच्या खात्यातून रक्कम ट्रान्सफर होते.

- अशा ठिकाणी ग्राहकाचे कार्ड स्वाइप करणारा व्यक्ती त्याच्या कार्डचा डाटा कॉपी करण्याकरता ग्राहकांची नजर चुकवुन पुढील चित्रात दाखविल्याप्रमाणे असणारे कार्ड स्किमर वापरून त्या कार्डचा डाटा स्कीम किंवा कॉपी करून घेतात आणि ग्राहकाने स्वाईप मशीन मध्ये दाखल केलेला पिन पाहून तो स्वतःकडे नोंद करून ठेवतात.

- अशा पद्धतीने दोन गुन्हे अनुक्रमे भोसरी व वाकड पोलिस स्टेशन येथे दाखल झाले असून त्यातील आरोपींना सायबर सेलने पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.





# डेबिट / क्रेडिट कार्ड क्लोनिंग होऊ नये याकरिता-




- ए.टी.एम. सेंटरमध्ये जाऊन आपले कार्ड वापरण्यापूर्वी तेथे एकदा कार्ड स्किमिंग स्लॉट लावला आहे का याची खात्री करा.

- पी ओ एस असेल किंवा ए.टी.एम. सेंटर आपला पिन दाखल करताना संबंधित मशीन चा कीबोर्ड एका हाताने झाकून घ्या म्हणजे तो गोपनीय राहील.

- हॉटेल, पेट्रोल पंप, दुकान, मॉल किंवा इतर पी.ओ.एस. असणाऱ्या ठिकाणी आपले क्रेडिट किंवा डेबिट कार्ड आपल्या समोरच स्वाईप करण्याची मागणी करा ते तुमच्या नजरेआड होऊ देऊ नका.

- आपल्या कार्ड द्वारे बिल पे करण्याकरिता इतरांच्या ताब्यात देऊन त्यांना कार्डचा पिन सांगू नका.

- आपल्या कार्डचा पिन नेहमी गोपनीय ठेवा आणि तो दर 100 दिवसांनी बदला, तो कार्डवर किंवा पॉकेट वर लिहून ठेवू नका.

- आपल्या कार्ड द्वारे होणाऱ्या व्यवहारानंतर आपल्या रजिस्टर मोबाईल नंबर वर तसा एसएमएस येतो का याची खात्री करा आणि ते वेळोवेळी तपासा.

# सावध व्हा, सुरक्षित रहा.

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,
पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in
Contact No.- 020- 27350939